**पंतप्रधानांची इस्रायलच्या राष्ट्रपतींशी भेट (26 फेब्रुवारी 2026)**

26 फेब्रुवारी 2026

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज जेरुसलेममध्ये इस्रायलचे राष्ट्रपती माननीय श्री. इसाक हर्झोग यांची भेट घेतली.

2. पंतप्रधानांनी 2017 मध्ये इस्रायल आणि 2023 मध्ये दुबई येथे राष्ट्राध्यक्ष हर्झोग यांच्यासोबतच्या त्यांच्या मागील भेटींना उजाळा दिला. दोन्ही नेत्यांनी नमूद केले की, भारत-इस्रायल संबंधांना "शांतता, नवोपक्रम आणि समृद्धी यासाठी विशेष धोरणात्मक भागीदारी" म्हणून उंचावणे हा द्विपक्षीय संबंधांमध्ये एक नवीन सुरुवात आहे आणि दोन्ही देशांमधील दृढ विश्वास, सामायिक लोकशाही मूल्ये आणि विशेष मैत्री दर्शविते. तसेच, व्यापार व तंत्रज्ञान, नवोपक्रम व उद्योग, संरक्षण व सुरक्षा तसेच दहशतवाद प्रतिरोध या क्षेत्रात सुरू असलेल्या सहकार्याबाबत दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केले.

3. दोन्ही नेत्यांनी परस्पर हिताच्या प्रादेशिक मुद्यांवरही चर्चा केली. गाझा शांतता योजनेला पाठिंबा व्यक्त करत, पंतप्रधानांनी पश्चिम आशियामध्ये शांतता आणि स्थैर्य साधण्यासाठी या उपक्रमाद्वारे करण्यात येत असलेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

4. दोन्ही राष्ट्रांच्या पर्यावरण संवर्धन मूल्यांचे प्रतीक म्हणून, पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष हर्झोग आणि फर्स्ट लेडी यांच्या उपस्थितीत राष्ट्राध्यक्षांच्या बागेत एक पेड माँ के नाम (मातेसाठी एक झाड) उपक्रमांतर्गत वृक्षारोपण केले.

5. पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष हर्झोग यांचे त्यांच्या आत्मीय आदरातिथ्याबद्दल आणि भारत-इस्रायल भागीदारीला दिलेल्या पाठिंब्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

जेरुसलेम

26 फेब्रुवारी 2026